महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


**अतितात्काळ/अत्यंत महत्वाचे :**

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/382

दिनांक : 5 FEB 2021

प्रति,

प्राचार्य,

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद / अंबड / जिंतूर / उस्मानाबाद / बीड / नांदेड /

पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, लातूर / शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म मंजुरीसाठी प्रक्रिया राबविण्याबाबत...**

संदर्भ १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७, दि. ०३/१२/२०२०

२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/१३, दि. १३/०१/२०२१.

आपणास कळविण्यांत येते की, सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडुन, महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ:https://mahadbtmahait.govt.in) बनविण्यात आलेले असून त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

संदर्भीय पत्र क्रं. १ नूसार या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विना-अनुदानित संस्थाप्रमुखांना संस्थेत प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांकडुन संबंधीत योजनांचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरुन ऑनलाईन मंजूरीबाबत विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याबाबत कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

सदर प्रक्रिया जलद गतीने पुर्ण करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. महाडीबीटी पोर्टलवर विविध संस्थांकडुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज मंजुर करण्यासाठी आपली संस्था ज्या जिल्हयात आहे, **त्या जिल्हयासाठी या कार्यालयातर्फे सक्षम अधिकारी म्हणुन आपली नेमणूक करण्यात येत आहे.** आपल्या जिल्हयातील या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना-अनुदानित संस्थांकडून विद्यार्थ्यांचे तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने आलेले अर्ज तपासणे तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्यास दुरुस्ती करिता संस्थेकडुन परत अर्ज दुरुस्तीसह मागविणे. ऑनलाईन पध्दतीने मंजुर केलेले अर्ज महाडीबीटीच्या पोर्टलवर पाठविणे. तसेच सदर प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करणे याबाबतची जबाबदारी आपली राहील. सदर प्रक्रियेसाठी आवश्यक लॉगीन आयडी व पासवर्ड आपणास या कार्यालयातर्फे पाठविण्यात येईल.

२. आपल्या अध्यक्षतेखाली अध्यापक व कर्मचारी यांची समिती तात्काळ स्थापन करुन, सदर प्रक्रिया तात्काळ कार्यान्वीत करावी व सदरील **कार्यालयीन आदेश संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या मोबाईल क्रमांकासह या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावे**. तसेच महाडीबीटी पोर्टलवर आपल्या संस्थेस देण्यात आलेले username चे पासवर्ड बदलुन घ्यावे व फक्त संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनाच ते अवगत करुन द्यावे.

३. आपल्या जिल्हयातील या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या शासकीय/अशासकीय अनुदानित/विना-अनुदानित संस्था प्रमुखांची बैठक आपल्या अध्यक्षतेखाली आयोजित करावी व प्रक्रिये संबंधी संपूर्ण माहिती दयावी. संस्थांनी पाठविलेल्या अर्जांची संख्या कमी प्रमाणात आहे असे आढळून आलेले आहे. त्याबाबत संबंधीत संस्थांना सुचित करुन प्रक्रिया जलद गतीने कार्यान्वीत करण्याच्या सूचना दयाव्यात.

४. खाली नमूद केल्याप्रमाणे संस्थांनी त्यांना दिलेल्या अभ्यासक्रमाचे अर्ज मंजुरीची कार्यवाही करावी.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | महाडीबीटी पोर्टलवर संस्थेस देण्यात आलेले RO username | अर्ज मंजूर करावयाचे जिल्हा / अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद | RO_AURANGABAD3_DTE | औरंगाबाद जिल्हातील सर्व औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / MBA / MCA चे अर्ज |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | RO_AURANGABAD1_DTE | औरंगाबाद जिल्हातील सर्व पदवी व पदविका अभियांत्रिकीचे अर्ज |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | RO_AURANGABAD4_DTE | परभणी व हिंगोली जिल्हातील सर्व अर्ज |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | RO_AURANGABAD5_DTE | नांदेड जिल्हातील सर्व अर्ज |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड | RO_AURANGABAD6_DTE | जालना जिल्हातील सर्व अर्ज |
| ६ | पु.ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | RO_AURANGABAD7_DTE | लातूर जिल्हातील सर्व पदवी व पदविका अभियांत्रिकीचे अर्ज |
| ७ | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | RO_AURANGABAD7_DTE | लातूर जिल्हातील सर्व औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / MBA / MCA चे अर्ज |
| ८ | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | RO_AURANGABAD8_DTE | उस्मानाबाद जिल्हातील सर्व अर्ज |
| ९ | शासकीय तंत्रनिकेतन, बीड | RO_AURANGABAD9_DTE | बीड जिल्हातील सर्व अर्ज |

५. **नॉन-आधार अर्ज मंजूरीसाठी पुढे पाठविण्यात येऊ नये.** (*संबंधित संस्थेस संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रोफाईल मध्ये आधार क्रमांक अपडेट केल्यानंतरच मंजुरीस्तव पुढे पाठविणेबाबत सूचित करावे)

६. **कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन सांख्याकी अहवालामध्ये Approved by the Department या स्तंभामध्ये आपल्या जिल्हयातील अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची आपण व्यक्तिशः दक्षता घ्यावी.**

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन **मासिक अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेस** या कार्यालयास सादर करावा. तसेच काही तांत्रिक अडचणी असल्यास या कार्यालयाचे आयटी सेल या विभागास ०२४०-२९७०४२९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद